# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १२२-२२** **दिनांक :- ०१/०५/२०२२**

## मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे वतीने महाराष्ट्र दिन साजरा.

दिनांक ०१/०५/२०२२ रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे वतीने पोलीस आयुक्त कार्यालय येथे ध्वजारोहण करुन राष्ट्रीय ध्वजास मानवंदना देण्यात आली. ध्वजारोहण कार्यक्रमप्रसंगी मा. श्री. सदानंद दाते, पोलीस आयुक्त यांनी उपस्थित अधिकारी अंमलदार यांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच महाराष्ट्र पोलीस हे सर्व जनतेच्या सुरक्षेबाबत कटिबध्द असून नियमीतपणे प्रामाणिक हेतूने कर्तव्य पार पाडतील असे मत व्यक्त केले. त्याचप्रमाणे मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील श्री. विलास चौघुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नेम-पेल्हार पोलीस ठाणे, श्री. प्रमोद बडाख, पोलीस निरीक्षक, नेम-गुन्हे शाखा युनिट क्र.३, श्री. तुषार जगताप, पोलीस उपनिरीक्षक, नेम-वाचक, पोलीस उपआयुक्त (मुख्यालय), श्री. बाळु बांदल, सहा. पोलीस उपनिरीक्षक, नेम. तुळींज पोलीस ठाणे व श्री जावेद मुल्ला, पोलीस शिपाई, नेम. पोलीस मुख्यालय, मि.भा.व.वि. यांना पोलीस दलातील उल्लेखनीय व प्रशंसनीय कामगिरीबद्दल मा. पोलीस महासंचालक पदक मंजुर झाल्याने मा. पोलीस आयुक्त यांनी उपरोक्त अधिकारी यांचे अभिनंदन करुन पोलीस महासंचालक पदक प्रदान केले.







--ooo---